# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 22/06/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

### विनयभंग

1) पो.स्टे. बोरी :– दि. 20/06/2020 चे 21:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 12 वर्षीय अल्पवयीन मुलगी/पीडिता हि घरी झोपली असता आरोपी नामे– जोसेफ झेव्हीयर स्टिवन, वय 50 वर्ष, रा. पेटीचुहा, ता. उमरेड जि. नागपूर याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ)(1)आय भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे 8355947473 या करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– दि. 20/06/2020 चे 23:59 वा. ते दि. 21/06/2020 चे 01:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्यामुळे फिर्यादी हि तिच्या भासऱ्याच्या घरी कुटंबासह राहते. त्या घराला दार नसल्याने पडदा लावुन ते राहत होते. फिर्यादी यांची 11 वर्षीय अल्पवयीन मुलगी/पिडीता हि रात्री पलंगावर झोपली असता आरोपी नामे– सुशांत धणराज वंजारी, वय 35 वर्ष, रा. दहेगाव याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. दरम्यान पीडिता ओरडली असता आरोपी हा पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ)(ब), 448 भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सोनाली राठोड या करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावर मौजा पचखेडी येथे दिनांक 11/06/2020 चे 11.00 वा. दरम्यान विमल ढेकलजी भोयर(मृतक), वय 70 वर्ष, रा. वाटोळा रामकृष्ण मंदिर जवळ नागपूर या त्यांचे जावई सह नागपूर येथुन पचखेडी येथे बॅकेतुन पैसे काढण्या करीता एम.एच– 40/ वाय– 7059 क्रमांकाच्या मोटरसायकलने जात होत्या. दरम्यान पचखेडी गावा जवळ मोटरसायकल समोर कुत्रा आडवा आल्याने विमल भोयर या मोटरसायकल वरून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांना उपचारकामी प्रथम पि.एच. सी मांढळ येथे नेले तेथुन ग्रामीण रूग्णालय कुही व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता वैदयकिय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतफै पोहवा विकास बोरसरे मेडीकल पोलीस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई प्रदीप खिल्लारे 9637090112 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपुर